## प्रेस नोट दिनांक ०८/०७/२०१९

### तडीपार असलेल्या सराईत गुन्हेगारास युनिट १, गुन्हे शाखेच्या टिमने केले जेरबंद

दि. ७/७/२०१९ रोजी युनिट १ चे कार्यक्षेत्रात वरिष्ठांच्या आदेशाने तडीपार, फरारी व पाहिजे आरोपी तसेच वाहन चोरीचे गुन्हयातील आरोपींचा शोध घेत असतांना पो.ना. तुषार खडके व पो.हवा. रिजवान जिनेडी यांना बातमी मिळाली की, विश्रामबाग पोलीस ठाणेचे अंतर्गत रहाणारा तडीपार आरोपी नामे सुरज यशवद हा वसीम जनरल स्टोअर्स जवळ, राजेंद्रनगर येथे उभा आहे. सदरची बातमी त्यांनी वरिष्ठांना कळविली व त्यांचे मार्गदर्शन तसेच सुचनांप्रमाणे युनिट १ च्या टिमने बातमी प्रमाणे खात्री करता बातमीमधील तडीपार आरोपी मिळून आलेने त्यास ताब्यात घेतले.

त्यास त्याचा नाव पत्ता विचारता त्याने त्याचे नाव व पत्ता सुरज भालचंद्र यशवद, वय २५ वर्षे, रा. विवेकश्री अपार्टमेंट, ८१० पीएमसी कॉलनी १००५ राजेंद्रनगर, सदाशिव पेठ, पुणे असे असल्याचे सांगितले. त्याने मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ १ यांचे आदेशाचा भंग करून वसीम जनरल स्टोअर्स, राजेंद्रनगर, नवीपेठ, पुणे येथे मिळून आलेने त्याचेवर विश्रामबाग पोलीस ठाणेचे अंतर्गत महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम १४२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून त्यास दोषारोपासह मा. न्यायालयात हजर करण्यात आले आहे. सदरच्या तडीपार आरोपी हा सराईत गुन्हेगार असून त्याचेवर जबरी चोरी, घरफोडी, जबरी संभोग, खुनाचा प्रयत्न, मारामारी असे एकुण ०८ गुन्हे दाखल आहेत.

सदरची कारवाई ही श्री. अशोक मोराळे सो., अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, श्री. शिरीष सरदेशपांडे, पोलीस उप-आयुक्त, गुन्हे. श्री समिर शेख, सहा.पोलीस आयुक्त, गुन्हे-१ यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. अरुण वायकर, पो.उप.निरी. दिनेश पाटील, पो.उप.निरी. हनुमंत शिंदे, पो.ना. तुषार खडके, पो.हवा. रिजवान जिनेडी, अशोक माने, स.पो.फौज. बाबा चव्हाण, पो.ना. इम्रान शेख, पो.हवा. अनिल घाडगे, अजय थोरात, प्रकाश लोखंडे, योगेश जगताप, सुभाष पिंगळे, श्रीकांत वाघवले, इरफान मोमीन, अमोल पवार, वैभव स्वामी, संजय बरकडे, सुधाकर माने, सचिन जाधव, प्रशांत गायकवाड, गजानन सोनुने, तुषार माळवदकर यांनी केली आहे.